F- 236

शासन ज्ञापन, क्रमांक- एलसीएस-२६००/४७७/प्र.क्र. ३११/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक १० एप्रिल, २००८

**विषय- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा**

मौजे बांद्रा, ता. अंधेरी, स. नं. ३४१, नभूक्र ६०८/१, ६०८/२ क्षेत्र १३४०.३० चौ. मी. हा भूखंड मेडिनोव्हा रिगल सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) यांना अंतिमरित्या मंजूर करण्याबाबत...

**पहा :-** १) शासन पत्र, महसूल व वन विभाग, क्रमांक- एलसीएस-२६००/४७७/प्र.क्र. ३११/ज-३, दिनांक १६/१/२००३

**शासन ज्ञापन :-**

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्रमांक- ११/३ अ/एफ-२३६, दिनांक १७/१/२००८ व विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना त्यांचे पत्र क्रमांक मशा/कार्या-२/जमीन-३/कावि-६९/०८, दिनांक ३१/१/२००८ ला अनुलक्षून विज्ञप्तीपुर्वक कळविण्यात येते की, मौजे बांद्रा, ता. अंधेरी, स. नं. ३४१, नभूक्र ६०८/१, ६०८/२ क्षेत्र १३४०.३० चौ. मी. हा भूखंड मेडिनोव्हा रिगल सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) यांच्या मागणीनुसार त्यांना देण्याबाबत शासनाने दिनांक १६/१/२००३ च्या पत्रान्वये यापुर्वी हेतूपत्र दिलेले आहे. आता संस्थेने सदर भूखंड त्यांना अंतिमरित्या मंजूर करण्यासाठी संस्थेच्या सभासदांची माहिती व आवश्यक कागदपत्रे सादर केली आहेत. सदर शासकीय जमीन, सहकारी गृहनिर्माण संस्थांना सवलतीच्या दराने शासकीय जमीन प्रदान करण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार त्या जमिनीच्या चालू बाजारभावाने शिघ्रसिध्द गणकानुसार येणा-या रकमेपैकी, संस्थेच्या सभासदांच्या उत्पन्न गटानुसार सवलतीची कब्जेहक्काची किंमत आकारुन येणारी रक्कम वसूल करुन शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक- एलसीएस- ०६०६/प्र.क्र. ५४/ज-१, दिनांक २५/५/२००७ मध्ये देण्यात आलेल्या अटी/शर्तीवर तसेच क्रमांक- जमीन-१०/२००३/प्र.क्र. ४०१/ज-१, दिनांक २५ जुलै, २००७ मधील सूचना, त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अटी/शर्तीवर व खालीलप्रमाणे विशिष्ट अतिरिक्त अटीवर सदर शासकीय जमीन मेडिनोव्हा रिगल सहकारी गृहनिर्माण संस्था यांना अंतिमरित्या मंजूर करण्यास तसेच सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये दिलेल्या संस्थेच्या सभासदांच्या सभासदत्वास मान्यता देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

**अटी :-** १) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर [illegible]नी शासन धोरण दिनांक २५/५/२००७ मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार, सोबत जोडलेल्या सभासदांच्या पात्रतेची, संस्थेने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पूर्णपणे खातरजमा करुन सभासदांना मान्यता द्यावी. त्यानंतरच संस्थेस उक्त जमीन ताब्यात देण्याची कार्यवाही करावी.

२) संस्थेमध्ये भविष्यात समाविष्ट करण्यात येणा-या नविन सभासदांची पात्रता शासनाच्या दिनांक २५/५/२००७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार तपासून सभासदांच्या सदस्यत्वास जिल्हाधिकारी यांची मान्यता घेणे बंधनकारक राहील.

२. सदरचे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १६९/०८/व्यय-९, दिनांक ५/४/२००८ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( वि. सि. वखारे )
अवर सचिव
महसूल व वन विभाग

सोबत- १) सभासदांची यादी (परिशिष्ट-अ)
२) सभासदांची जिल्हाधिकारी यांनी सादर केलेली कागदपत्रे.

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा
प्रशासकीय इमारत,
बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

प्रतिलिपी :-

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२) जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, पुणे
३) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई
४) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, मुंबई उपनगर जिल्हा.
५) महालेखापाल, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
६) महालेखपाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
७) वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.
८) नगर विकास विभाग, नवि-११, मंत्रालय, मुंबई.
९) श्री. जी. एन. शेणॉय, मुख्य प्रवर्तक, मेडिनोव्हा सहकारी गृहनिर्माण संस्था. नियोजित), ब-७/१४९ विभाग-१, चित्तनंजन नगर, राजावाडी, मुंबई-४०० ०७७
१०) ज-३ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

**शासन ज्ञापन क्रमांक- एलसीएस-२६००/४७७/प्र.क्र. ३११/ज-३, दिनांक १० एप्रिल, २००८**

**सोबतचे परिशिष्ट "अ"**

| अ.क्र. | सभासदांचे नांव | प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | श्री. गोपळकृष्ण नरसिंग शेणॉय | खुला |
| २ | कु. श्यामल वेताळे | मागासवर्गीय |
| ३ | डॉ. चंद्रकांत चौधरी | खुला |
| ४ | श्री. शाम तागडे | मागासवर्गीय |
| ५ | श्री. अशोक शर्मा | खुला |
| ६ | श्री. राजेश माणिकराव गायकवाड | खुला |
| ७ | श्री. संतोष अ. फडतरे | खुला |
| ८ | श्री. जीवन लक्ष्मण सावंत | मागासवर्गीय |
| ९ | डॉ. रेखा मुकुंद डावर | खुला |
| १० | डॉ. छत्रपती शिवाजी | खुला |
| ११ | कुमारी शशिकला भावे | खुला |
| १२ | श्रीमती सारिका माने | खुला |
| १३ | श्रीमती प्रतिभा फंड | खुला |

( वि. सि. वखारे )
अवर सचिव
महसूल व वन विभाग.

// जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

*प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१*

दूरध्वनी : ६५५६७९९, फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@yahoo.com

क्रमांक : ११/३ अ/एफ-२३६
दिनांक २०/५/२००८

**वाचले :** १) शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. एलसीएस-२६००/४७७/प्र.क्र. ३११/ज-३ दिनांक १०/४/२००८.
२) या कार्यालयीन पत्र समक्रमांक दि. २१/४/२००८.
३) संस्थेचे पत्र दिनांक २०/५/२००८.

**आदेशः**

मौजे बांद्रा, ता. अंधेरी स.नं. ३४१, न.भू.क्र. ६०८/१ व २ (न.भू.क्र. ६०८/१ब /१) मधील क्षेत्र १३४०.३० चौ. मी. हा भुखंड संस्थेस त्या जमीनीच्या चालू बाजारभावाने शिघ्रसिध्दगणकानुसार येणाऱ्या रकमेपैकी, संस्थेच्या सभासदांच्या उत्पन्न गटानुसार सवलतीची किंमत आकारुन येणारी रक्कम वसूल करुन शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एलसीएस-०६०६/प्र.क्र. ५४/ज-१ दि. २५/५/२००७ व क्र. जमीन-१०/२००३/प्र.क्र. ४०१/ज-१, दि. २५ जुलै ०७ मधील अटी तसेच जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अटी/ शर्तीसह काही अतिरिक्त अटीवर अंतिमरित्या मंजूर करण्यास तसेच ज्ञापना सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये दिलेल्या संस्थेच्या सभासदांच्या सभासदत्वास अंतिम मान्यता देण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.

संस्थेस या कार्यालयाचे पत्र दिनांक २१/४/२००८ अन्वये प्रस्तुत जमीनीची शिघ्रसिध्दगणकाप्रमाणे प्रचलीत बाजारभावानुसार सभासदांच्या उत्पन्न गटाप्रमाणे सवलतीची कब्जेहक्काची रक्कम रु. ७८,८७,३१०/- या कार्यालयात जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे नावे राखीने अथवा पे ऑर्डरने भरणा करणेबाबत कळविण्यात आले होते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये संस्थेस ज्ञापनासोबतच्या जोडपत्रातील १३ सभासदांसह संस्थेची नोंदणी करुन नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सादर करणे व निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांची यादी संस्थेच्या ठरावासह सादर करणे . तसेच जमीन मंजुरीबाबत निर्धारीत करण्यात येणाऱ्या अटी व शर्ती संस्थेस मान्य व बंधनकारक राहतील, तसेच जमीनीबाबत करारनामा करणेसाठी बोलावणेत येईल, त्यावेळी कार्यालयात हजर राहुन करारनाम्यावर सहया करण्यात येतील, अशा आशयाचे हमीपत्र रु. २०/- च्या मुद्रांक शुल्क कागदावर करुन या कार्यालयात सादर करणेस कळविण्यात आले होते.

संस्थेने त्यांचे उपरोक्त दिनांक २०/५/२००८ अन्वये सवलतीची कब्जेहक्काची रक्कम रुपये ७८,८७,३१०/- या कार्यालयात दिनांक २०/५/२००८ रोजी डिमांड ड्रुफ्टव्दारे भरणा केली आहे. संस्थेची नोंदणी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचेकडे करुन नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक एमयुएम/डब्ल्युएचई/एचएसजी/ (टीसी) /१४१२१/२००८ - ०९ ची प्रत व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची यादी संस्थेच्या ठरावासह सादर केली आहे. तसेच जमीन मंजुरीबाबत निर्धारीत करण्यात येणाऱ्या अटी / शर्ती संस्थेस मान्य व बंधनकारक राहतील तसेच जमीनीबाबत करारनामा करणेसाठी बोलावणेत येईल, त्यावेळी कार्यालयात हजर राहुन करारनाम्यावर सहया करण्यात येतील, अशा आशयाचे हमीपत्र रु. २०/- च्या मुद्रांक शुल्क कागदावर करुन या कार्यालयात सादर केले आहे.

त्याअर्थी, मौजे बांद्रा, ता. अंधेरी स.नं. ३४१, न.भू.क्र. ६०८/१ व २ (न.भू.क्र. ६०८/१ब /१) मधील, क्षेत्र १३४०.३० चौ. मी. हा भुखंड संस्थेस शासन ज्ञापन दिनांक १०/४/२००८ व शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्र. एलसीएस-०६०६/प्र.क्र. ५४/ज-१ दि. २५/५/२००७ सोबतचे जोडपत्र ब मधील अटी आणि क्र. जमीन-१०/२००३/प्र.क्र. ४०१/ज-१, दि. २५ जुलै ०७ मधील अटी तसेच जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा

अटी/ शर्तीसह काही अतिरिक्त अटीवर प्रदान करण्यास तसेच शासन ज्ञापनासोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये दिलेल्या संस्थेच्या सभासदांच्या सभासदत्वास सोबतच्या जोडपत्राप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

**अटी :**

१) संस्थेमध्ये संस्थेच्या एकूण सदस्य संख्येच्या ३ % सदस्य अंध/अपंग प्रवर्गातून समाविष्ट करणे अनिवार्य राहील.

२) सभासदांच्या उत्पन्नगटाप्रमाणे अनुज्ञेय क्षेत्रानुसार संस्थेमध्ये भविष्यात समाविष्ट करण्यात येणाऱ्या नवीन सभासदांची पात्रता शासनाच्या दि. २५/५/०३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार तपासून सभासदांच्या सदस्यत्वास जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांची मान्यता घेणे आवश्यक राहील.

३) सभासदांच्या उत्पन्नगटानुसार अनुज्ञेय क्षेत्रानुसार आणखी ३८७.१९ चौ. मी. क्षेत्र शिल्लक असलेमुळे किमान ४ सभासदांना सामावुन घ्यावे लागेल. त्यानुसार चार जागा रिक्त ठेवण्यात आल्या आहेत. त्यासाठी संस्थेने प्रस्ताव सादर करावेत.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,
चेअरमन / सेक्रेटरी
मेडीनोव्हा रिगल को. ऑप. हौसिंग सोसायटी लि.
बी-७/१४९, विभाग I चित्तरंजननगर,
राजावाडी, मुंबई ४०० ०७७.

**प्रत :**

१) मा. अपर मुख्य सचिव ( महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

२) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई ठाणे ४०० ६१४ यांना माहितीसाठी सादर.

३) तहसिलदार अंधेरी / नगर भुमापन अधिकारी बांद्रे / उपनिबंधक सहकारी संस्था एच (पूर्व) विभाग, बांद्रे (प.) मुंबई यांचेकडे आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.

२/- त्यांनी संस्थेस मंजूर जमीनीचा ताबा देऊन अधिकार अभिलेख अद्ययावत करावेत. व ताबेपावती, नकाशा व सुधारीत मिळकत पत्रिकेसह पुर्तता अहवाल सादर करावा.

४) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ( एच/पुर्व )विभाग , सहकार बझार इमारत, ४ था मजला, बांद्रे रेल्वे स्टेशनसमोर, बांद्रे (प.) मुंबई ४०० ०५० यांचेकडे आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

Scanned by CamScanner

९८३

पत्र क्र. ११/३ अ /एफ-२३६ दि. २०/०५/२००८ सोबतचे परिशिष्ट

| सभासद क्रमांक | सभासदाचे नांव व प्रवर्ग | व्यवसाय शासकीय / खाजगी |
|---|---|---|
| १) | श्री. गोपाळकृष्ण नरसिंग शेणॉय | खाजगी |
| २) | कु. शामल पी. वेताळे ( मागासवर्गीय) | खाजगी |
| ३) | डॉ. श्री. चंद्रकांत अे. चौधरी | खाजगी |
| ४) | श्री. शाम अ. तागडे ( मागासवर्गीय) | शासकीय |
| ५) | श्री: अशोक संपतलाल शर्मा | शासकीय |
| ६) | श्री. राजेश माणिकराव गायकवाड | शासकीय |
| ७) | श्री. संतोष आ. फडतरे | खाजगी |
| ८) | श्री. जीवन म. सावंत ( मागासवर्गीय ) | खाजगी |
| ९) | डॉ. सौ. रेखा गुस्ताद डावर | शासकीय |
| १०) | डॉ. श्री. छत्रपती शिवाजी | शासकीय |
| ११) | कु. शशिकला विठ्ठल भावे | खाजगी |
| १२) | कु. सारीका शिवाजी माने | खाजगी |
| १३) | श्रीमती प्रतिभा कमलाकर फंड | शासकीय |

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा